**BDC LIBRARY**
**News Paper Clipping**
**A.Y. 2025-26**

# सेंद्रिय शेतीला प्राधान्य द्या : डॉ. प्रिया शिंदे

## 'विषमुक्त स्वयंपाक घराघरात पोहोचवा' महिला सक्षमीकरण मेळाव्यात आवाहन

मुक्तागिरी वृत्तसेवा

**पाटण, दि. २३ :** ''पंचतत्व अशुद्ध होत असून रसायनांच्या वापराने पृथ्वी विषयुक्त होत आहे. वसुंधरा, नदी, गोमातेचे पूजन न करता त्यांना शुद्ध स्वरूपात ठेवले पाहिजे,'' असे मत सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष डॉ. प्रिया शिंदे यांनी व्यक्त केले.

स्व. श्रीमंत सौ. उमादेवी विक्रमसिंह पाटणकर प्रतिष्ठान संचालित 'सह्याद्रीच्या सखी मंच, पाटण' आयोजित महिला सक्षमीकरण संघटन मेळावा डॉ. अब्दुल कलाम सभागृहात उत्साहात पार पडला.

''पूर्वी खेड्यात डायबेटीस, हृदयरोग, कर्करोग माहिती नव्हता. पाकिटबंद तेल, कृत्रिम रंग, शीतपेये, कॅफेन, मेयोनीज घातक आहे. माती विषमय झाली तर अन्नही विषयुक्त होते. त्यामुळे सेंद्रिय परसबाग फुलवा, विषमुक्त स्वयंपाक घराघरात पोहोचवा,'' असे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले.

विकास नारी शक्ती जागृत झाली की विकास होतो. पन्नास टक्के जनता स्त्री शक्ती आहे. संधीचे सोने करणे आपल्या हातात आहे. घराचे व्यवस्थापन करताना तेलाच्या बाबत गांभीर्याने विचार करा, असे त्यांनी सांगितले.



**पाटण :** आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. प्रिया शिंदे व्यासपीठावर इतर मान्यवर

तेजस्विनी घोरपडे म्हणाल्या, मोदीजी पंतप्रधान झाल्यानंतर महिलांसाठी अनेक योजना आल्या. भविष्यांत मतदारसंघात जास्तीत जास्त महिला उद्योजिका व्हाव्यात यासाठी प्रयत्न करू.'' मनिषा केळकर यांनी, ''महिलांना बोलून सन्मान नको, नेतृत्वाची संधी द्या. घरातील महिला उद्योजिका झाली तर घर व गाव समृद्ध होते, असे मत मांडले. ऋतुजा शिंदे यांनी महिला बालकल्याणच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याची ग्वाही दिली.

प्रास्ताविकात डॉ. ऐश्वर्यादेवी पाटणकर म्हणाल्या, महिला सक्षम होण्यासाठी पायावर उभे राहणे गरजेचे आहे. सखी मंचच्या माध्यमातून आम्ही तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचणार आहोत. कार्यक्रमाची सुरुवात संजीवन सागर खांडके यांच्या 'स्त्री शक्ती जागर' नृत्याने झाली. सूत्रसंचालन शिलादेवी पाटणकर यांनी केले.

यावेळी सत्यजितसिंह पाटणकर, राजाभाऊ शेलार, याज्ञसेन पाटणकर, अर्चना देसाई, अश्विनी भोईटे, अनिता देवकांत व आजी-माजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य उपस्थित होते.